**महत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, लेखा विभाग,
क्र. लेखा/३३/कावि/७७२/२०१६,
दिनांक :- २० /०६/२०१६

**विषय :- मानधन कर्मचाऱ्यांचे उत्पन्न प्रमाणपत्र (फॉर्म १६ अ) बाबत...**
**आर्थिक वर्ष २०१६-१७ (एप्रिल २०१६ ते मार्च २०१७)**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये व्यावसायिक डॉक्टर, मेडिकल ऑफिसर, लेब टेक्निशियन, स्टाफ नर्स, ड्रायव्हर इत्यादींच्या करार पध्दतीने व मनपाच्या क्षेत्रीय कार्यालयामधील आरोग्य विभागातील घंटागाडी मानधन कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करून कामे करून घेतली जातात. सबंधितांच्या मानधन देय बिलांमधून विभागाने कपात केलेला आयकर, लेखा विभागाकडून मुदतीत बँकेमार्फत आयकर विभागाकडे एकत्रितरीत्या जमा केला आहे. टी.डी.एस रिटर्न केल्यानंतर या सर्व मानधन कर्मचाऱ्यांचे **फॉर्म १६ (अ)** आयकर विभागामार्फत वर्षातून एकदा आयकर खात्याच्या संकेतस्थळावरती उपलब्ध होतात.

तरी रुग्णालयांमधील मानधन कर्मचाऱ्यांचे व क्षेत्रीय कार्यालयामधील घंटागाडी मानधन कर्मचाऱ्यांचे **फॉर्म १६ (अ)** ची सॉफ्ट कॉपी संबंधित पगारबील लिपिक कर्मचाऱ्यांनी लेखा विभागातून दिनांक २०/०६/२०१७ नंतर PEN DRIVE मध्ये घेऊन जावी. त्यासाठी सदर कर्मचाऱ्यांच्या नाव व PAN Number ची लिस्ट मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉर्मेटमध्ये त्याच PEN DRIVE मध्ये लेखा विभागात त्वरित जमा करण्यात यावी जेणेकरून या सर्व मानधन कर्मचाऱ्यांचे **फॉर्म १६ (अ)** सॉफ्ट कॉपी स्वरुपात एकत्रित करून आपले विभागाकडे कर्मचाऱ्यांना बजावणे कामी देणे सोयीस्कर होईल.

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

प्रति :- १) सर्व आहरण-वितरण अधिकारी
---------------------विभाग
२) सर्व संबंधित विभाग प्रमुख
---------------------विभाग